**<u>ठळक बातम्या</u>**

- एनपीएस आणि युपीएस अंतर्गत सरकारी कर्मचाऱ्यांनाही खासगी प्रमाणे शेअर बाजारात अधिक गुंतवणुकीचा मार्ग खुला

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या मन की बात मधून श्रोत्यांशी संवाद साधणार

- राज्यात महायुतीत कोणताही बेबनाव नाही, याचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला पुनरुच्चार

- ऑस्ट्रेलिया बरोबरचा एकदिवसीय क्रिकेट सामना भारताने जिंकला/ रोहित शर्माचं शतक

आणि

- ज्येष्ठ अभिनेते सतीश शहा यांचं निधन

**<><><><>**

एनपीएस अर्थात राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना आणि युपीएस अर्थात एकिकृत निवृत्ती वेतन योजनेतल्या सरकारी अधिकारी कर्मचाऱ्यांनाही आता LC ७५ अर्थात Life Cycle 75 आणि BLC अर्थात Balanced Life Cycle या पर्यायांचा अवलंब करता येणार आहे. आतापर्यंत केवळ खासगी क्षेत्रातल्या कर्मचाऱ्यांना या सुविधा उपलब्ध होत्या. LC 75 मध्ये सरकारी कर्मचाऱ्यांना ७५ टक्क्यांपर्यंतची गुंतवणूक शेअर बाजारात करता येईल. हे नवे पर्याय खुले झाल्यानं सरकारी कर्मचाऱ्यांना युपीएस आणि एनपीएसमधल्या गुंतवणुकीसाठी अधिकाधिक मार्ग उपलब्ध होतील, शेअर बाजारातली गुंतवणूक वाढवण्याचा पर्याय असल्यानं त्यांना अधिक परतावा मिळवता येईल.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधतील. या कार्यक्रमाचा हा १२७ वा भाग आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व प्रसारण सेवा, आकाशवाणी न्यूज वेबसाइट आणि न्यूज-ऑन-एअर मोबाईल ॲप वर कार्यक्रम प्रसारित केला जाईल. तसंच एअर-न्यूज,

डीडी न्यूज, पीएमओ आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब चॅनल वर कार्यक्रमाचं थेट प्रसारण होईल.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने नुकत्याच लागू केलेल्या जीएसटी दर सुधारणांमुळे गेल्या २२ सप्टेंबर पासून देशभरात बचत उत्सव सुरु झाला आहे. पादत्राणे उद्योगासाठी जीएसटी चे नवे  दर लागू झाल्यामुळे नागरिकांना त्याचा लाभ मिळत आहे. याबद्दल आमच्या प्रतिनिधीनं माहिती दिली.

**[VC- AMAN]**

*(जीएसटीच्या दर सुधारणांमुळे चर्मोद्योग आणि पादत्राणे उद्योगाला मोठा दिलासा मिळाला आहे. युवा उद्योजकांना दिलासा देण्याच्या उद्देशानं केलेल्या या सुधारणांमुळे उत्पादनाचा खर्च कमी झाला आहे, तसंच दर्जेदार पादत्राणं ग्राहकांना परवडण्याजोगी झाली आहेत.*

*या नव्या कर रचने नुसार, चामोईस लेदर, लेदर फायबरपासून बनवलेलं  कंपोझिशन लेदर, आणि टॅनिंग किंवा क्रस्टिंगनंतर तयार केलेल्या चामड्यावरचा जीएसटी दर १२ टक्क्यावरून ५ टक्के इतका कमी करण्यात आला आहे. यामुळे उत्पादनाच्या खर्चात लक्षणीय घट झाली असून, देशात चर्मोद्योगाला प्रोत्साहन मिळालं आहे.*

*नव्या कर रचनेनुसार अडीच हजार रुपयांपर्यंत किमतीच्या पादत्राणांवर आता १२ टक्क्या ऐवजी ५ टक्के जीएसटी आकारला जाईल. त्यामुळे आकर्षक आणि टिकाऊ पादत्राणं मध्यम उत्पन्न गटाच्या आवाक्यात येतील. त्याचप्रमाणे चामड्याशी संबंधित कामावरचा जीएसटी १२ टक्क्यावरून ५ टक्के करण्यात आल्यामुळे  सूक्ष्म-लघु आणि मध्यम उद्योगांचा उत्पादन खर्च कमी होईल आणि या उद्योगांची स्पर्धात्मकता वाढेल.*
*या उपाययोजनांमुळे केवळ देशांतर्गत उत्पादनाला चालना मिळणार नसून,    भारताची निर्यात क्षमताही बळकट होईल, रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील आणि तरुणांच्या नेतृत्वाखालची उद्योजकता आणि उत्पादन क्षेत्रातलं  स्वावलंबित्व वाढवण्याच्या सरकारच्या दृष्टिकोनालाही  बळ मिळेल.)*

**<><><><>**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी ही भेट घेतल्याचं त्यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. राज्यात महायुतीत कोणताही बेबनाव नाही, याचा पुनरुच्चार त्यांनी केला. शिवसेना नेते रवींद्र धंगेकर यांनी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर केलेल्या आरोपांबाबत विचारलं असता, महायुतीत कुठेही मतभेद होता कामा नयेत, याची काळजी प्रत्येकानं घ्यावी, असा निरोप पक्षाकडून धंगेकरांना दिला असल्याचं शिंदे म्हणाले.

**<><><><>**

सर्वज्ञ चक्रधर स्वामींची  विचारसरणी राज्यासह देशासाठी महत्वाची असून सामान्य माणसाला आध्यात्मिक दिशा दाखविण्यासोबतच त्यांनी समाजात समतेचा विचार रुजवला, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. नाशिक इथं आज  अखिल भारतीय महानुभाव परिषदेच्या ३८ व्या  अधिवेशनाला सुरुवात झाली त्यावेळी ते बोलत होते. दरम्यान, अे◌ाझर विमानतळावर मुख्यमंत्र्यांचं  स्वागत करताना श्री त्र्यंबकेश्वर देवस्थानच्या माध्यमातून मुख्यमंत्री सहायता निधीसाठी १ कोटी ११ लाख रुपयांचा धनादेश आज मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द करण्यात आल्याची माहिती आमच्या बातमीदारानं दिली आहे.

**<><><><>**

प्रशासकीय कामकाजात कृत्रिम बुद्धीमत्तेचा  वापर करणारा देशातला पहिला जिल्हा ठरलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या कामकाजाची पाहणी करण्यासाठी  नीती आयोगाचं एक पथक ३० आणि ३१ ऑक्टोबर रोजी सिंधुदुर्गात येत आहे. पालकमंत्री नितेश राणे यांनी आज ओरोस इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. निती आयोगाचं पथक या दौऱ्यात आरोग्य, शिक्षण, संरक्षण आणि कृषी विभागात कृत्रिम बुद्धीमत्तेच्या सहाय्याने सुरु असलेल्या कामांचा अभ्यास करणार आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे सुरु असून काम पूर्ण होताच बाधित शेतकऱ्यांच्या खात्यात तातडीने मदत जमा केली जाईल अशी ग्वाही त्यांनी दिली. फळबाग विमा योजनेंतर्गत ९० कोटी रुपयांचं वाटप नुकतंच झाल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. शेतकऱ्यांप्रमाणेच यावर्षी मच्छीमारांनाही सवलती देण्यात येणार असल्याचंही त्यांनी  सांगितलं.

**<><><><>**

भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यात पर्थ इथं रंगलेल्या आजच्या तिसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारतानं ऑस्ट्रेलियाचा ९ गडी राखून पराभव केला. तीन सामन्यांच्या या मालिकेतील या आधीचे दोन्ही सामने आणि मालिका ऑस्ट्रेलियाने जिंकली आहे.

ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करत ४६ षटकं आणि ४ चेंडूत २३६ धावा केल्या. भारतान केवळ ३८षटकं ३ चेंडूत ही धावसंख्या पार केली. रोहित शर्माच्या १२१ धावांच्या खेळीला विराट कोहलीनं ७४ धावा काढून चांगली साथ दिली. या दोघांच्या १६७ धावांच्या भागीदारीच्या जोरावर भारतानं हा विजय नोंदवला. रोहित शर्माला सामनावीर आणि मालिकावीराचा मान मिळाला.

**<><><><>**

शेतीमाल प्रक्रिया उद्योगात निर्माण होणाऱ्या मालाला जगभरात मोठ्या प्रमाणावर मागणी असल्यामुळे महिला बचतगट आणि स्टार्टअप अंतर्गत महिलांच्या उद्योग व्यवसायाला नाबार्ड आणि रिझर्व बँकेकडून अर्थसाह्य केले जाणार असल्याचं परभणीच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे यांनी सांगितलं. यावेळी पाच महिला बचत गटांना ५० लाख रुपयांचे धनादेश पालकमंत्र्यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. पूर्णा शहरातील श्री साईबाबा महिला नागरी सहकारी पतसंस्थाचं उद्घाटन करताना त्या बोलत होत्या.

**<><><><>**

ज्येष्ठ विनोदी अभिनेते सतीश शहा यांचं आज दुपारी अडीच वाजता मुंबईत निधन झालं. ते ७४ वर्षांचे होते. त्यांना हिंदुजा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मूत्रपिंड निकामी झाल्याने आज दुपारी त्यांचं निधन झालं. त्यांच्या पार्थिवावर उद्या अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

१९७२ मधे पुण्याच्या चित्रपट प्रशिक्षण संस्थेमधून अभिनय क्षेत्रात आलेले सतीश शहा यांच्या अनेक भूमिका गाजल्या. दूरदर्शनवर आलेल्या त्यांच्या ये जो है जिंदगी या मालिकेत विविध रंगी भूमिकांनी ते रसिकांच्या मनात घर करुन राहिले. जाने भी दो यारो या विनोदी चित्रपटातली त्यांची भूमिकाही संस्मरणीय ठरली. हम आपके है कौन, हम साथ साथ है, दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे अशा अनेक चित्रपटांमधल्या त्यांच्या भूमिका आजही

रसिकांच्या चांगल्याच लक्षात आहेत. साराभाई वर्सेस साराभाई या मालिकेतला त्यांचा काहीसा भोळा इंदू लोकांना प्रचंड भावला.

ज्येष्ठ विनोदी अभिनेते जॉनी लिव्हर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक मान्यवरांनी सतीश शहा यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. आपल्या सहज सुंदर अभिनयातून साकारलेल्या भूमिकांच्या रुपाने ते रसिकांच्या मनात चिरंतन वास करतील असं मुख्यमंत्र्यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे.

**<><><><>**

मुंबईचा AQI अर्थात हवेचा दर्जा दर्शवणारा निर्देशांक सुधारला आहे. दिवाळीत हा निर्देशांक झपाट्याने खालावला होता. दोन दिवस काही ठिकाणी पडलेल्या तुरळक पावसाने धुरके खाली बसून निर्देशांकात सुधार व्हायला मदत झाली.  बहुतांशी ठिकाणी हा निर्देशांक मध्यम श्रेणीत पोचला.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात काल रात्रीपासून पावसाचा जोर वाढल्यामुळे भातशेतीचं  नुकसान झालं आहे.

**गडचिरोली** शहरासह जिल्ह्याच्या विविध भागात पावसाने हजेरी लावली. संध्याकाळी ४ च्या सुमारास आलेल्या या पावसामुळे   जनजीवन विस्कळीत झालं.

**धुळे** जिल्ह्यात आज सलग दुसऱ्या दिवशी पुन्हा एकदा अवकाळी पावसाने तडाखा दिला.

**<><><><>**

येत्या २-३ दिवसात राज्याच्या बहुतांश भागात मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. आगामी २-३ दिवसात विदर्भ आणि मराठवाड्याचा काही भाग वगळता इतर सर्वत्र हवामान विभागानं येलो अलर्ट जारी केला आहे.

**//<><><><>//**